# ग्लास्गो राष्ट्रकुल स्पर्धेला सुरुवात

## नीरज चोप्रा, मिराबाई चानू सुवर्णपदकासाठी सज्ज; ७४ देशांतील खेळाडू नशीब आजमावणार

**महाईन्यूज । ग्लास्गो**

**क्रीडा जगताचे लक्ष लागून राहिलेल्या २३ व्या राष्ट्रकुल खेळांचा थरार आजपासून (दि. २३) स्कॉटलंडमधील ग्लास्गो शहरात सुरू होत आहे. तब्बल ७४ देशांतील सुमारे ३ हजारांहून अधिक खेळाडू या क्रीडा महाकुंभातील १० विविध खेळांमध्ये आपले नशीब आजमावतील. भारतीय प्रमाणवेळेनुसार आज रात्री १०.३० वाजता ‘ओव्हो हायड्रो’ येथे होणाऱ्या दिमाखदार उद्घाटन सोहळ्याने या स्पर्धेचे बिगुल वाजणार आहे. त्यापूर्वी भारताच्या मोहिमेची सुरुवात आज दुपारी २.०० वाजल्यापासून ‘लॉन बॉल्स’च्या सामन्याने होईल.**



खर्च कपातीमुळे यंदा कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस यांसारख्या भारताच्या हक्काच्या खेळांना स्पर्धेतून वगळण्यात आले आहे. गेल्या २०२२ च्या बर्मिंगहॅम स्पर्धेत भारताने जिंकलेल्या ६१ पदकांपैकी २५ पदके याच चार खेळांतील होती. त्यामुळे यंदा भारताची संपूर्ण मदार प्रामुख्याने ॲथलेटिक्स, बॉक्सिंग आणि वेटलिफ्टिंग या तीन खेळांवर असेल. ॲथलेटिक्समध्ये भारताने सर्वाधिक ३२ खेळाडूंचे पथक उतरवले आहे. यंदाच्या मोहिमेत सुवर्णपदकासाठी नीरज चोप्रा व मिराबाई चानू यांच्यावर भारताची प्रामुख्याने भिस्त असेल.

ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्याने वाढत्या खर्चामुळे आयोजनातून माघार घेतल्याने, ग्लास्गोने अत्यंत कमी बजेटमध्ये ही स्पर्धा आयोजित केली आहे. मात्र, यासाठी मोठी छाटणी करण्यात आली असून, क्रीडा प्रकारांची संख्या १९ वरून थेट १० वर आणण्यात आली आहे. या क्रीडा कपातीचा सर्वाधिक फटका भारताला बसणार आहे. वगळण्यात आलेल्या ९ खेळांमध्ये भारताचे पारंपरिक वर्चस्व असलेले खेळ समाविष्ट आहेत.

२०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने ६१ पदके जिंकली होती. त्यापैकी तब्बल २८ पदके कुस्ती (६ सुवर्णांसह १२ पदके), बॅडमिंटन (६ पदके), टेबल टेनिस (७ पदके), हॉकी (२ पदके) आणि महिला क्रिकेट (१ पदक) या खेळांमधून आली होती. हे सर्व हक्काचे खेळ यंदा पूर्णपणे वगळण्यात आल्यामुळे भारताला यंदा ३० पदकांचा टप्पा ओलांडण्यासाठीही कमालीचा संघर्ष करावा लागणार आहे.

गेल्या दोन दशकांपासून (२००२ मँचेस्टर गेम्सपासून) प्रत्येक राष्ट्रकुल स्पर्धेत पदतालिकेत अव्वल पाचमध्ये राहण्याचा भारताचा ऐतिहासिक रेकॉर्ड आहे. मात्र, यंदा भारताला ज्या खेळात अधिक पदके मिळतात, ते खेळच समाविष्ट नसल्याने हा रेकॉर्ड राखणे भारतासाठी ‘अग्निपरीक्षा’ ठरणार आहे.

### सांगता समारंभात रश्मिका, शंकर महादेवन यांचा जलवा

यंदाच्या राष्ट्रकुल स्पर्धेचा सांगता समारंभ २ ऑगस्ट रोजी होणार असून, या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण बॉलीवूड अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि दिग्गज गायक-संगीतकार शंकर महादेवन हे असतील. या दिमाखदार सोहळ्यात भारताकडे अधिकृतपणे २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद सोपवले जाईल. २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा अहमदाबादमध्ये खेळवली जाणार आहे. यजमानपद स्वीकारण्याच्या या ऐतिहासिक क्षणामुळे भारताच्या क्रीडा क्षेत्रासाठी नवे पर्व सुरू होणार असल्याचे मानले जात आहे. तसेच, अहमदाबादमध्ये जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा आणि पायाभूत विकासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भारत-झिम्बाब्वे यांच्यात टी-२० मालिकेचा थरार

**महाईन्यूज । हरारे**

**आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अनपेक्षित पराभवाचे धक्के पचवल्यानंतर, आता भारतीय क्रिकेट संघ झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत विजयाच्या ट्रॅकवर परतण्यासाठी सज्ज झाला आहे. हरारे स्पोर्ट्स क्लबवर आयोजित या मालिकेतील पहिला सामना गुरुवारी सायंकाळी ४.३० पासून खेळवला जाईल**





कर्णधार म्हणून खेळलेल्या पहिल्या सात सामन्यांपैकी सहा सामने गमावल्यानंतर श्रेयस अय्यरसाठी ही मालिका स्वतःचे नेतृत्व सिद्ध करण्याची आणि ड्रेसिंग रूमचा गमावलेला आत्मविश्वास परत मिळवण्याची मोठी संधी असेल. अनुभवी संजू सॅमसनची या दौऱ्यासाठी निवड न झाल्यामुळे पंजाबचा धडाकेबाज फलंदाज अभिषेक शर्मा आणि अवघ्या १५ वर्षांचा डाव्या हाताचा युवा सनसनाटी फलंदाज वैभव सूर्यवंशी डावाची सुरुवात करतील हे आता स्पष्ट झाले आहे.

या दौऱ्यासाठी भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या अनुपस्थितीत राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांच्याकडे हंगामी मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. आक्रमक आणि सातत्याने प्रयोग करणाऱ्या गंभीर यांच्या तुलनेत लक्ष्मण यांची कार्यशाली संयमावर भर देणारी आहे. लक्ष्मण सहसा अंतिम अकरा खेळाडूंमध्ये जास्त फेरबदल करत नाहीत. त्यामुळे या मालिकेसाठी संघात स्थैर्य राखत विजय मिळवून देणे, हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट असेल.

भारतीय संघासाठी ही मालिका केवळ विजय मिळवण्यापुरती मर्यादित नसून आगामी टी-२० विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्याची ही सुवर्णसंधी असेल. फलंदाजीसोबतच गोलंदाजी विभागातील सातत्य आणि क्षेत्ररक्षणातील चपळाईवरही संघ व्यवस्थापनाचे विशेष लक्ष असेल.

### भारताला कोणतीही ढिलाई नाही परवडणार

हरारेच्या खेळपट्टीवर सुरुवातीला वेगवान गोलंदाजांना मदत मिळण्याची शक्यता असल्याने पॉवरप्लेमधील कामगिरी निर्णायक ठरू शकते. मधल्या फळीत अनुभवी खेळाडूंनी जबाबदारी स्वीकारत डावाला स्थैर्य देणेही तितकेच महत्त्वाचे असेल. झिम्बाब्वेचा संघ घरच्या मैदानावर धक्का देण्याची क्षमता ठेवत असल्याने भारताला कोणतीही ढिलाई परवडणारी नाही. या मालिकेत दमदार सुरुवात करून आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या पराभवाचे सावट दूर करण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. त्यामुळे हरारेतील पहिल्या सामन्यात भारतीय खेळाडू आत्मविश्वासपूर्ण आणि आक्रमक खेळ करत विजयाने मालिकेची सुरुवात करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरतील.